# स्त्रीवादी साहित्य निर्मितीची प्रेरणा

**श्रीमती कौशल्या माधवराव खरात**
संशोधक विद्यार्थीनी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना :**

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व क्षेत्रात परिवर्तनाला सुरुवात झाली. परिवर्तनाची लाट आपल्या महाराष्ट्र राज्यात आली. सर्व क्षेत्रात वेगाने बदल घडू लागले. शिक्षणामुळे लोकशाहीचे विचार अनेक घटकापर्यंत पोहोचला. समाजातील दुर्लक्षीत व वंचित लोक शिक्षणाच्या प्रसारामुळे जागे होऊ लागले. ग्रामीण परिसर, ग्रामीण भागातील अनु. जाती, अनु. जमाती, भटके, विमुक्त व आदिवासी देखील शिक्षणाच्या प्रवाहात आले. शिक्षणामुळे दूर असलेले कामगार, शेतकरी व स्त्रीदेखील शिक्षणाच्या प्रवाहात आल्या प्रत्येकाला शिक्षण मिळाल्यामुळे समाजामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वाचा प्रसार झाला. या गोष्टीमुळे मानवी मूल्यांची जाणीव व विषम समाजात व्यवस्था विरोधातले समाधान यामुळे समाजात वेदना आणि विद्रोहाने सत्याचा जन्म घेतला. वाङ्मयीन भाषेत या प्रवाहाला स्वातंत्र्यत्र्योत्तर वाङ्मयप्रवाह असे म्हटले गेले. त्यामध्ये जनवादी प्रवाह दलित प्रवाह, ग्रामीण प्रवाह व स्त्रीवादी प्रवाह या विस्तारित प्रवाहांचा समावेश झाला. या प्रवाहातील स्त्रीवादी प्रवाहाला अतिशय महत्त्वाचा प्रवाह आहे.

आपल्याला स्त्रातंत्र्य मिळल्यानंतर स्त्रियांना मोकळया मनाने शिक्षण घेता येऊ लागले. त्या शिक्षणातून त्यांची अस्मिता जागृत झाली. त्यांना एका नविन जगाची ओळख झाली. समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे जाणवते ते त्यांच्या लक्षात आले. लहानपणी वडिल, तरुण वयात पती, वृध्दकाळात मुलगा त्यांच्यावर पिढया नपिढया अधिराज्य गाजवत होता. भारतीय समाज व्यवस्था दलितांना व स्त्रियांना खूप खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. ‘चूल आणि मूल’ एवढी स्त्रियांची पारंपारिक कुटुंबात व समाजात कसल्याही प्रकारे निर्णय घेण्याचा आधिकार नव्हता. तिच्यासाठी सर्व क्षेत्रे खुली झाली. स्त्रीयांच्या लढाईचे एक पर्व संपले तरी त्यांच्याकडे वेगवेगळया नजरेने पाहिले जाते.आजही स्त्री आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग करु शकत नाही. आज राजकारणात स्त्रियांसाठी राखीव जागा असल्या तरी पुरुषांच्या हातातले बाहुले म्हणून त्यांना वावरावे लागते. परंतु अलीकडच्या काळात स्त्रियांमध्ये स्वातंत्र्याची जाणीव झाली आहे. आपणही माणूस आहोत, आपणही पुरुषांपेक्षा कमी नाही. स्त्रीला पण पुरुषांसोबत समानतेची वागणूक मिळाली पाहिजे हा आग्रह धरु लागली. स्त्रियांना जे हक्क मिळाले त्यातून त्या लेखन करु लागल्या व स्त्री लेखिका म्हणून समोर आल्या अनेक स्त्रियांनी कथा कादंबरी व काव्यलेखन केले आहे. मागील शतकात कथा व कादंबऱ्या जेवढया प्रकाशित झालेल्या आहेत. त्यामध्ये, स्त्री लेखिकांनी कथा व कांदबऱ्यांचा जास्त प्रमाणात समावेश आहे स्त्रियांनी त्यांच्या साहित्यातून स्त्री देखील माणूस आहे हे स्पष्टपणे मांडले आहे. स्त्रियांनी केलेले लेखन हे हौसेपोटी केलेले नाही. त्यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांच्या समस्या व्यथा स्पष्टपणे मांडल्या आहे. विवाह संस्थेची कमतरता त्यांना जाणवत होती. व त्यामुळे स्त्रियांची होणारी मानसिक कुचंबणा त्यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांच्या समस्या सर्वासमोर आणल्या त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रियाचं लेखन करु लागल्या.

शिक्षण घेऊन ही पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. तिला तिच्या वैयक्तिक महत्त्वाचा विकास करता येत नाही. याची या लेखिलेला खंत वाटते. 'स्त्री' हा त्यांच्या चिंतनाचा विषय बनला. कमलाबाई टिळक, विभावरी, क्षमाराव कृष्णाई, गीता साने, आनंदीबाई किर्लोस्कर, पिराज आनंदकर व कुसुमावती देशपांडे इ. लेखिकांनी त्याकाळात स्त्री मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. स्त्रीच्यांच्या दशेची व अवहेलनेची जाणीव सर्वांना झाली पाहिजे. त्यांचे प्रश्न आकांक्षा व अपेक्षा त्यांना हिरीरीने मांडल्या कारण या काळात अशाप्रकाच्या वृत्तीचा उदय झाला. कृष्णाबाई या टापेणनावाने लिहणाऱ्या सौ. मुक्ताबाई दीक्षित यांनी स्त्री मनाचेही निःसंकोचपणे चित्रण केले आहे. त्या कथेत प्रश्न मांडण्याची धडपड करतात. आपल्या मनातल्या बोचणाऱ्या भावनेचे शल्य व्यक्त करण्याची ओढ कृष्णाबाईना होती.

१९३३ मध्ये 'कळयांचे निःश्वास' नावाचा कथासंग्रह विभावरी शिरुरकर यांनी प्रसिध्द केला. या कथासंग्रहानी, स्त्री साहित्यात मोलाची भर घातली आजवर स्त्रीसाठी जे लेखन केले होते. त्याहीपेक्षा कितीतरी वेगळे होते. स्त्रीयांना ज्या वेदना सहन कराव्या लागत होत्या. तसेच त्यांचा सर्व पातळीवर होणार कोडमारा विभावरीच्या कथा संग्रहात दिसून येते. कथा संग्रहात लेखनाच्या तीवृतेच्या साहित्य क्षेत्रात सर्वच बाजूंनी टिका झाली त्यांनी आपल्या कथामधून प्रौढ कुमारिकेच्या व्यथा मांडल्या स्त्रीच्या विविध समस्यावर त्यांचा होणारा छळ यावर त्यांनी धीटपणे भाष्य केले.

विभावरी प्रमाणे सौ. कमलाबाई टिळक यांनी देखील स्त्रीच्या प्रश्नाचे मनोविश्लेषण साहित्यावर गेले त्याचे कमलाबाई टिळक यांच्या कथाचा वेगळेपणा आहे. कृष्णाई, विभावरी, कमलाबाई टिळक, क्षमाराव आनंदीबाई किर्लोस्कर यांच्या पेक्षा वेगळया घाटाची आयामाची कथा हया काव्यात प्रवृत्तीच्या असून त्यातून त्यांने स्त्रीमनाचे चित्रण केले आहे. त्याच बरोबर स्त्रीयांचा सुखःदुःखाचा शोध घेतांना आढळतो. वस्तुस्थितीचे ही योग्य चित्रण केले आहे. सौ. वसुंधरा पटवर्धन, सौ. कुसुमावती समकालीन होत्या. त्यांना ही कथा लेखन केले. स्त्रीच्या भावनिक वर्णन साहित्यातून दिसून येते. त्यानंतर तारा वनारसे यांना लेखन करुन स्त्रीवादी साहित्याला एक वंशवर्ण त्यांना 'पश्चिम कडा' या कथासंग्रहातून स्त्रीच्या दुःखाना वाचा फोडली. शांता शेळके यांचे कथा लेखन सुध्दा स्त्रीवादी साहित्याला पूरक आहे.

शिरीष पै या प्रसिध्द नाटककार अत्रे यांच्या कन्या आहे. त्यामुळे साहित्यांचा वारसा त्यांच्या रक्तातच दिसून येतो. त्यांना आपल्या साहित्यातून जगातील आनंदापेक्षा जगातील दुःखाला जास्त स्थान दिले आहे. म्हणून त्यांनी स्त्रीयांचे दुःख आपल्या लिखानातून मांडले आहे. स्त्री वेदनाचे आविष्कार आपल्या साहित्यात आला आहे. त्यांच्यानंतर लेखन करणाऱ्या सौ. सुधा नरवणे यांची निवेदनशैली इतर लेखिकेपेक्षा वेगळी असून त्या प्रसंगानुसार कथानकात रंग भरतात. त्यांच्या लेखनात आजिबात भडकपणा नाही.

स्त्रीवादी साहित्याचे लेखन करणाऱ्या इंदिरा संत, इंद्रायणी सावरकर, स्नेहलता दसनूरकर, योगीन जोगळेकर, श्रीवास्तव, पद्यजा फाटक, मोहिनी वर्दे, जोत्स्ना देवघर इ. कथालेखिका आहे. या सर्व लेखिकेने स्त्रीयांच्या जीवनात गांभीर्याने लिखान केले आहे. तरी देखिल ग्रामीण स्त्री आली नाही. कारण जोपर्यंत ग्रामीण भागातील स्वतःहा शिकून मोठी होत नाही. तोर्यंत त्यांचा समावेश स्त्रीवादी साहित्यातून म्हणावा तसा होणार नाही. आधुनिक काळात दलित साहित्यात ही स्त्रीवादी साहित्याची निर्मिती होत. आत्मचरित्र साहित्य प्रकारातून स्त्रीचे चित्रण केले जात आहे.

फारच थोडया स्त्रियांनी कथालेखन केले आहे. तसे पाहिले तर मराठी साहित्यात 'स्त्रीवादी' कथालेखन करणाऱ्या काही लेखिका आहेत. तरी देखील स्त्रीलेखन स्त्री साहित्य समृध्द केले आहे.

नंतरच्या काळात 'स्त्री' लेखिकेच्या आविष्कारला जेवढी क्षेत्रे खुली झाली तेवढया क्षेत्राचा उपयोग आपल्या साहित्यून कसा येईल याकडे लक्ष वेधले. एक काळ असा होता की, स्त्रीला गरजेपोटी घराबाहेर पाऊल टाकावे लागले. आता तिला आत्मविकासासाठी शिक्षण घेता येते. झपाटयाने होत असलेले औद्योगिकीकरण, संतती नियमन, अर्थार्जन, समाजने संधी या सर्वामुळे स्त्रीजीवन झपाटयाने बदलत आहे. आपले हक्क, स्वातंत्र्य स्त्री अधिकार यांचे भान आल्याने जी पूर्वीची शरणागत, समन्वयवादी भूमिका होती ती बाजूला झाली आहे एकदम आत्मिक बळाने उचले घ्यावी तसा बदल होऊन स्त्रीवादी जाणिव निर्माण झाली. स्त्रियांना मिळालेले गौणत्व, तिच्या अधिकारांची झालेली पायमल्ली, पशतुल्य वागणूक, आर्थिक घटकांमधील वाटा नसणे अशा विविध गोष्टीमुळे जनजागृती झाली यातूनच प्रस्थापित सत्तेमध्ये व पुरुषसत्ताक समाजव्यवस्था तसेच राज्यव्यवस्थेमध्ये बदल करण्याची भूमिका, जाणिव स्त्रियांमध्ये निर्माण झाली व त्यातून स्त्रीवादी साहित्य आकार घेऊ लागले.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१) आधुनिक वाड्मयातील प्रवाहः ग्रामीण, दलित, स्त्रीवादी आणि आदिवासी प्रा. डी. विशाल, सरस्वती प्रकाशन औरंगाबाद.

२) नाईक, शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवादी, मुंबई, २००७.

३) भागवत, विद्युत, स्त्रीजन्माची वाटचाल, पुणे, २००४.

४) वरखेडे, मंगला, संपा, स्त्रीवादी समीक्षाः संकल्पना व उपयोजन, धुळे, १९९९.

५) सारडा, शंकर, स्त्रीवादी कादंबऱ्या, पुणे, १९९३.

६) आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड १,२-अ.ना.देशपांडे.

७) मराठी साहित्यः इतिहास आणि संस्कृती-वसंत आबाजी डहाके.

८) साहित्याची निर्मितीप्रक्रिया, आनंद यादव, महेता प्रकाशन, पुणे.

९) स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, डॉ. वंदना महाजन विजय प्रकाशन, नागपूर दि. १५ ऑगस्ट २०१५.

१०) देशपांडे ग. त्र्यं. भारतीय साहित्यशास्त्र, मुंबई, १९६३.